<u>उलटतपास – श्री. के. जी. पाटील वकील.</u>

४. माझे इंजिनिअरींगचे शिक्षण झालेले आहे. मी सध्या आजरा साखर कारखान्यात नोकरी करतो. मी घटनेच्या दिवशी आणि पंचनामा केल्या दिवशी घरी हजर होतो. घटनास्थळा पासून माझे घर ७०० मीटर अंतरावरती आहे. मी घटनेच्या दुस–या दिवशी कामावरती गेलो होतो. मला ७ तारखेला मी सुट्टीमुळे किंवा रजेमुळे घरी हजर होतो याबाबत निश्चित सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ७ तारखेला घरी नसल्यामुळे मला कोणत्या कारणाने घरी होतो याबाबत सांगता येत नाही. मला घटनेची माहिती त्याच दिवशी रात्री कळाली होती.

५. माझा आरोपीं सोबत वाद नाही. आरोपींनी पुर्वी माझ्या विरोधात पोलिसांकडे तक्रारी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्या तक्रारी लाकडे तोडण्यासह जमिनीच्या वादाबाबत दिल्या होत्या. मला ए. पी. आय. शिंदे साहेबांनी फोन करुन पंचनाम्यासाठी बोलावले होते. माझी व शिंदे साहेबांची ओळख नाही. मला माझा मोबाईल क्रमांक शिंदे साहेबांकडे कसा आला याची माहिती नाही. शिंदे साहेबांनी मला घटनास्थळी आल्यावर फोन केला होता. मी शिंदे साहेबांना त्यांनी कोणाकडून मोबाईल क्रमांक घेऊन फोन केला होता याबाबत विचारणा केली नव्हती. मी शिंदे साहेबांना फोन आला तेव्हा कशाबाबत बोलवत आहात याबाबत विचारले होते.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझा आरोपीं सोबत पुर्वीपासून वाद असल्यामुळे मी पोलिस ठाण्यात जाऊन पंचनाम्यावरती स्वाक्षरी केली आहे. घटनास्थळी मी पंचनाम्यासाठी गेलो तेव्हा शिंदे साहेब, एक पोलिस कर्मचारी, खैरे व आरोपीच्या घरातील सर्व लोक आणि आरोपीच्या घराशेजारील आनंदा लक्ष्मण मालव हजर होते. पोलिसांनी घटनास्थळावरील पडलेल्या काठीचा पंचनामा केला होता. असे काही घडले नाही की, माझ्या समक्ष पोलिसांना फिर्यादीच्या पतीने काठी दिली होती. घटना घडलेल्या रात्री मी घटनास्थळी गेलो होतो. पंचनाम्याच्या दिवशी पोलिस येईपर्यंत मी घटनास्थळी गेलो नव्हतो.

७. हे म्हणणे खरे नाही की, मी ७ तारखेला पंचनाम्यासाठी गेल्याचे खोटे

सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी तेथे आनंदा मालव हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आरोपीं सोबत वैमनस्य असल्यामुळे मी खोटया पंचनाम्यावरती स्वाक्ष–या केल्या आहेत.

८. पोलिसांनी घटनास्थळ पंचनामा आंबाडे गावातील आंबाडे ते खेडगे पाणंद रस्त्यावरील खैरे यांच्या घराच्या पुर्व दिशेला ७० फूट अंतरावरती आणि आनंदा मालव यांच्या घरापासून दक्षिण दिशेला ५० फूट अंतरावरती असलेल्या रस्त्यापासून ८५ फूट अंतरावरती इलेक्ट्रीक पोल असलेल्या जागेदरम्यान पंचनामा केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितलेल्या ठिकाणी पोलिसांनी पंचनामा केल्याचे खोटे सांगत आहे. मला फिर्यादी व तिच्या पतीने घटनेच्या रात्री ०९.०० ते ०९.१५ वाजेच्या दरम्यान घटनेबाबत सांगितले होते. मी त्यानंतर घरी निघून गेलो होतो. खैरे यांनी ते पोलिस ठाण्यात जाणार असल्याचे मला सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मला घटने बाबत पुर्वीच माहिती असल्यामुळे मी पंचनाम्या वरती स्वाक्षरी केली आहे.

९. पोलिसांनी लिहिलेल्या पंचनाम्यावरती मी स्वाक्षरी केली आहे. मी ७ तारखेला संपूर्ण दिवसात पोलिस ठाण्यात गेलो नव्हतो. मी ६ तारखेला फोन करुन खैरे यांच्याकडून पोलिस ठाण्यात काय झाले याबाबत माहिती घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनेच्या रात्री फिर्यादी व तिच्या पतीने मला घटने बाबत सांगितल्याचे खोटे कथन करत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझा आरोपीं सोबत वाद असून त्यांना त्रास व्हावा या हेतूने पंचनाम्यासाठी हजर नसून देखील माझ्या समक्ष पंचनामा झाल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पंचनामा झाला त्या ठिकाणी खैरे व आरोपी हजर असल्याचे मी खोटे सांगत आहे.

**१०.** माझे आरोपींच्या जमिनी लगत कोणतेही क्षेत्र नाही. साक्षीदार स्वतःहून सांगतो, आरोपींचे आंबाडे गावात कोणतेही क्षेत्र नाही. मी सदर बाब ऑनलाईन उतारे आणि अतिक्रमण रजिस्टरच्या नोंदी पाहून सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींच्या ताब्यात असलेल्या जमिनीमुळे माझा त्यांच्यावरती राग आहे. हे

म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपींचा यापूर्वी पिण्याच्या पाण्याच्या पाईप लाईन वरुन वाद झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पिण्याच्या पाण्याची पाईन लाईन तोडल्यामुळे आरोपींनी माझ्या विरोधात पोलिसांकडे तक्रार केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष पंचनामा लिहिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणताही पंचनामा झालेला नाही.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०२.०७.२०२६.

आजरा.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते